# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ८८५/२०२२

तक्रारकर्ता, श्री.विलास हरी ओटवणकर
मु.पो.आयनल मणेरवाडी
ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय कणकवली, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय कणकवली, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २१/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २०/१२/२०२१ | ---- | २२/३/२०२२ | १८/४/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२३/५/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती न मिळाल्यामुळे " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २१/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.मंगेश यादव, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय कणकवली व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.शिवजी राठोड, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय कणकवली हे ऑनलाइनरित्या उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" गाव आयनल ता.कणकवली माझे भूखाते क्र.१८ चिरेकाढणे अधिकृत आणि अनाधिकृत करण्यात आले आहे. असे माझ्या निदर्शनास आले आहे. खाणमालक म्हणून श्री.बापू ज्ञानदेव फाटक यांनी रितसर परवाना दिला असल्याची सविस्तर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.१८/४/२०२२ रोजी सुनावणी घेऊन, *“अपिलकार यांना त्यांनी मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी तथा प्र.निवासी नायब तहसिलदार कणकवली यांनी अभिलेखात शोध घेवून उपलब्ध झाल्यास १० दिवसात विनामुल्य नोंदणीकृत टपालाने पुरविण्यात यावी. तसेच माहिती उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टीकरणासह लेखी कळविणेत यावे.”* असा निर्णय दिलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी निवदेन केले की, तक्रारकर्ता यांना दि.१०/५/२०२५ च्या पत्रान्वये माहिती दिली आहे. याव्दारे तक्रारदार यांना कळविले की, सदर माहितीचा या कार्यालयाच्या अभिलेखात शोध घेतला असता सदरची

माहिती आढळून येत नाही. मात्र ती का आढळून येत नाही हे तक्रारदार यांना कळविले नाही. त्यामुळे माहितीबाबत निश्चित बोध होईल अशा रितीने तक्रारदार यांना कळविणे आवश्यक आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती तहसिलदार कणकवली कार्यालयात आढळून न येण्याचे काय कारण आहे ते तक्रारदार यांना १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावे.**

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ मे, २०२५ .

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र